नि.क्रं ८० खाली आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्रं १ ते ४ यांनी दाव्यास कैफियत नि.क्र ५ चे अर्जास जबाब व प्रतिहक्काचा दावा दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन कैफियत , जबाब व प्रतिहक्काचा दावा करण्यात यावा याकरिता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादीचे म्हणणे असे की, प्रतिवादीने दाखल केलेली कैफियत, नि.क्र ५ चे अर्जास जबाब व प्रतिहक्काचा दावा दाखल करुन घेण्यास वादी यांनी हरकत घेतली असुन वादीच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्रं १,२व ४ यांना १८ दिवस व प्रतिवादी क्रं ३ यांना २० दिवस विलंब झालेला आहे. त्यामुळे सदर विलंब माफ करुन प्रतिवादींनी दाखल केलेले कैफियत नि.क्रं ५ चे अर्जास जबाब व प्रतिहक्काचा दावा दाखल करण्याची परवानगी देण्यात यावी अशी विनंती केली.

३. प्रस्तुत अर्जास वादीने म्हणणे दाखल केलेले आहे. वादीचे म्हणणे असे की, वादीने नि.क्रं ७९ अन्वये पुरसिस दाखल केलेली आहे ती या जबाबाचा भाग म्हणुन वाचण्यात यावा. प्रतिवादी नं १, २ व ४ यांना नि.क्रं १० ते १३ अन्वये दि.१३/०४/२०२२ रोजी बजावणी झालेली असुन बजावणी होउन १०८ दिवस झालेले आहे. तसेच प्रतिवादी नं ३ यांना नि.क्रं १६ व १७ अन्वये दि.११/०४/२०२२ रोजी बजावणी होउन ११० दिवस झालेले आहेत. प्रतिवादी क्रं १ ते ३ हे उच्च पदस्थ व्यक्ती असुन त्यांनी दिलेल्या म्हणण्यानुसार त्यांना जास्तीत जास्त उत्पन्न असुन दावा जमिनीची आवश्यकता नाही. तसेच कायदयाचे सखोल ज्ञान असुनही प्रतिवादी यांनी जाणून बुजुन प्रतिवादींना त्रास होण्याच्या उददेशाने कैफियत वेळेत दाखल केलेली नाही. प्रतिवादींनी विलंब माफी करिता कोणतेही कायदेशीर कारण दिलेले नाही. त्यामुळे प्रतिवादींचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

४. प्रस्तुत अर्जाचे व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकला.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रतिवादी क्रं १, २ व ४ यांना नि.क्रं.१०, १२ व १६ प्रमाणे दि.१६/०४/२०२१ रोजी समन्सची बजावणी झालेली आहे. तसेच प्रतिवादी क्रं ३ यांना नि.क्रं१४ प्रमाणे दि.११/०४/२०२२ रोजी समन्सची बजावणी झालेली आहे. दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ८ नियम १ प्रमाणे प्रतिवादींनी

समन्स मिळाल्यापासुन ३० दिवसांमध्ये व जास्तीत जास्त ९० दिवसामध्ये कैफियत दाखल करणे आवश्यक आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी क्रं १ ते ४ यांनी नमुद कालावधीमध्ये कैफियत दाखल केली नसुन त्यांना कैफियत दाखल करण्याकरिता विलंब झालेला आहे.

६. प्रतिवादींचे म्हणणे असे की, सदरचा विलंब हा प्रतिवादींनी जाणुन बुजुन केलेला नाही. तसेच कागदपत्र मिळण्यास व प्रतिवादी वेगवेगळया ठिकाणी दुर दुर राहत असल्यामुळे एकत्रीत येउन व कागदपत्रे गोळा करुन महत्वाची माहिती देउन कैफियत व कागदपत्रे दाखल करण्यास विलंब झालेला आहे. प्रतिवादींनी नमुद केलेले कारण ध्यानात घेता सदर विलंब माफ करणे न्यायोचित होईल. या ठिकाणी हे ध्यानात घेणे जरुरीचे की, प्रस्तुतचा दावा गुणदोषावर चालविण्याकरिता प्रतिवादींचे म्हणणे अभिलेखावर दाखल करुन घेणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रस्तुत दाव्याचे स्वरुप तसेच नैसर्गिक न्यायतत्व ध्यानात घेता प्रतिवादीस त्यांचे म्हणणे देण्याची मुभा देणे न्यायोचित आहे. त्यामुळे उपरोक्त कारणमिमांसा ध्यानात घेता सदरचा अर्ज खर्चासह मंजुर होण्यास पात्र आहे. त्यामुळे खालील आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज नि.क्रं ८० खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्रं १ ते ४ यांनी वादीस रक्कम रु २००/- वाद खर्च दयावा.

सही
(ह.उ.उ.पाटील)
सह दिवाणी न्यायाधीश, भोर
जि.पुणे.

दिनांक : २७/०९/२०२२

## Certificate

**"I affirm that the contents of this P.D.F file Order are same word for word as per original Order.**
**Name of the Steno : V.G.Fulari**
**Court Name : H.U.U. Patil**
**Jt. C.J.J.D., Bhor, Dist. Pune.**
**Date : 27/09/2022**
**Order signed by presiding officer on : 29/09/2022**
**Order uploaded on : 29/09/2022.**